MHPU250038592023

**नि. क्र. ०५ खालील आदेश**
(पारित दि. ०२.०५.२०२६)

**०१.** प्रस्तूतच्या अर्जाद्वारे अर्जदाराने स्वतःकरीता दरमहा १५,०००/– रुपये अंतरीम पोटगी देण्याची विनंती केली आहे. तिचे असे म्हणणे आहे की, ती हिंसाचार पिडीत स्त्री आहे. तिच्या पालन पोषणाची, औषधोपचाराची कायदेशिर जबाबदारी सामनेवालांची आहे. अर्जदार तिचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. जाब देणार हयाने तिच्या पालनपोषणाची कोणतीही तरतूद केलेली नाही. त्यामुळे तिला परावलंबी जीवन जगावे लागत आहे. जाब देणार हयाचा रिलायन्स प्रोडक्ट विक्रीचा व्यवसाय असुन त्याला दरमहा ५०,०००/– रुपये उत्पन्न मिळते. जाब देणार क्र.२ हे सेवानिवृत्त असून त्यांना पेन्शन मिळते. त्यामुळे जाब देणार क्रमांक १ हयाचेवर जाब देणार क्रमांक २ व ३ यांची जबाबदारी नाही. तो अर्जदारास दरमहा १५,०००,/– रुपये पोटगी ऐण्यास समर्थ आहे.

**०२.** जाब देणार हयाने निशाणी क्र. १८ वर कैफीयत दाखल करुन अर्जदाराने केलेले आरोप नाकारले आहेत. लग्नामध्ये त्याने अर्जदारास ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र, १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे लहान मंगळसुत्र, ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी व ५० ग्रॅमचे चांदीचे दा्रीने दिले होते. त्यामुळे तो कर्जबाजारी झालेला आहे. अर्जदार ही सासरी आल्यानंतर सासरचे लोकांशी खुलेपणाणे बोलत नसे व एकटीच खोलीमध्ये बसून राहत असे. ती जाबदेणार हयास शारिरीक सुख देत नसे व त्याच्याशी भांडण करत असे. अर्जदार हिच्या इच्छेकरिता जाबदेणार हयाची आर्थिक ऐपत नसूनही फेब्रुवारी २०२३ मध्ये त्याने मोठा खर्च करुन अर्जदार हिला विमानाने गोवा येथे फिरायला घेऊन गेला. अर्जदारास स्वयंपाक सुध्दा करता येत नव्हता. ती मुद्दाम काहीही न करता बसून राहत असे व तासं–तास फोनवर गप्पा मारत असे. जाबदेणार क्र. २ व ३ हयांचा सुध्दा

ती अपमान करत असे. जाबदेणार हयास दरमहा ५०,०००/– रुपये उत्पन्न मिळत नाही. जाबदेणार हयाची आर्थिक परिस्थीती कमकूवत आहे. हयाउलट, अर्जदार हिचे वडीलांचा मोठा व्यवसाय असून तो व्यवसाय अर्जदार हिच पाहत असते. त्यातून त्यांना लाखो रुपयांचे उत्पन्न मिळते. अर्जदार ही कोणावरही अवलंबून नाही. शेवटी त्याने अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

**०३.** अर्जदाराचे वकिल श्री. एस. एच. पारखे हयांनी असा युक्तीवाद केला की, जाबदेणार हयाची आर्थिक परिस्थीती मजबूत आहे. त्याने अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा छळ केलेला आहे. त्याला दरमहा ५०,०००/– रुपये उत्पन्न मिळते. तसेच त्याला भाडयापासून सुध्दा उत्पन्न मिळते. जाबदेणार हयाचे वकिल श्री आर. एस. तांबे हयांनी असा युक्तीवाद केला की, मुळ अर्जाच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये अर्जदाराने स्वतःच जाबदेणार क्र. १ हिचा व्यवसाय बुडाला असल्याचे नमूद केले आहे. जाबदेणार हयाला आता कोणतेही उत्पन्न मिळत नाही. त्याच्या उत्पन्नाबाबत अर्जदाराने कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. जाबदेणार हयाचे कुटुंब गरिब आहे. त्याचे आई–वडील नेहमी आजारी असतात. अर्जदार ही खाजगी नोकरी करते. त्यामुळे तिला अंतरिम पोटगीची आवश्यकता नाही.

**०४.** अर्जदार व जाबदेणार या दोघांनीही एकमेकांवर आरोप केलेले आहेत. मात्र त्या आरोपामध्ये तथ्य आहे किंवा नाही, हे पुराव्याअंती निष्पन्न होणार आहे. अर्जदारास कौटुंबिक हिंसाचाराचा सामना करावा लागला अथवा नाही हे सुध्दा पुराव्यानंतरच सिध्द होणार आहे. मात्र अर्जामध्ये तिचेवर जाब देणार यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी आरोप आहे. नातेसंबंध दोघांनाही कबूल आहेत. अशा स्थितीत पत्नीचे पालन पोषण करण्याची नैतिक व कायदेशिर जबाबदारी जाबदेणार क्र. १ हयाची आहे. हयावेळी जाबदेणार क्र. १ च्या उत्पन्ना बाबत कोणतेही मत व्यक्त करणे योग्य होणार नाही. मात्र जाबदेणार हयाने अर्जदारास ६८ ग्राम सोन्याचे दागिने दिल्याचे नमूद केलेले आहे. तसेच जाबदेणार हा अर्जदारास विमानाने गोवा येथे फिरविण्याकरिता घेऊन गेला होता, असे सुध्दा त्याने नमूद केले आहे. म्हणजेच प्रथमदर्शनी अर्जदाराची

आर्थिक परिस्थीती सधन असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार हिने दरमहा १५,०००/– रुपये पोटगी देण्याची मागणी केलेली आहे. मात्र असे असले तरी अंतरीम पोटगी देण्याच्या उद्देश हा पोटगी ची रक्कम निर्धारित करणे हा नसून अर्जदारास दैनंदिन गरजांसाठी तसेच न्यायालयीन कार्यवाहीसाठी तत्काळ आर्थिक मदत उपलब्ध करुन देणे असा आहे व पती या नात्याने ही जबाबदारी जाब देणार क्र.१ हयाचीच आहे. तसेच जाब देणार हयाचे उत्पन्नाचे स्त्रोत अदयाप पुराव्यानिशी सिध्द झालेले नाहीत. त्यामुळे अर्जदाराची ही मागणी मंजूर करता येणार नाही. अर्जदार आता पुरती दरमहा ३०००/– रुपये अंतरीम पोटगी मंजूर करणे योग्य वाटते. अर्जदाराने जरी अर्ज दाखल तारखेपासून पोटगी देण्याची विनंती केलेली असली तरी, तिने स्वतःचे उत्पन्न व दायित्व हयांचे शपथपत्र दिनांक २०.०४.२०२६ रोजी दाखल केलेले आहे. म्हणजेच अंतरिम आदेश होण्यास अर्जदार हिस जबाबदार आहे. त्यामुळे अर्जदाराला दिनांक २०.०४.२०२६ पासून अंतरिम पोटगी मंजूर करणे योग्य वाटते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१** अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**०२** जाब देणार क्र. १ याने अर्जदाराला अंतरीम पोटगी म्हणून ३०००/– (अक्षरी – तीन हजार मात्र) रुपये दिनांक २०.०४.२०२६ रोजी पासून दयावे.

**०३** जाबदेणार हयाने पोटगीची प्रथम रक्कम दिल्यापासून ९० दिवसांच्या आत अर्जदाराने पुराव्याचे शपथपत्र दाखल करावे. अर्जदाराने शपथपत्र दाखल न केल्यास हा आदेश स्थगीत समजण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ANANT HIMMATRAO BAJAD
Date: 2026.05.02 16:57:51 +0530

(अनंत हिम्मतराव बाजड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
जुन्नर

जुन्नर
दि.०२.०५.२०२६